**नॅशनल नेटवर्क ऑफ सेक्स वर्कर्स (एनएनएसडब्ल्यू,) " वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्ति मानवी तस्करी ला विरोध करणाऱ्या मध्ये सर्व प्रथम आहेत ."**

आजचा दिवस मानवी तस्करी विरोधी जागतिक दिवस म्हणून युनायटेड नेशन्स ने घोषित केला आहे. , नॅशनल नेटवर्क ऑफ सेक्स वर्कर्स (NNSW) मानवी तस्करी च्या भयंकर गुन्हा समाप्त करण्यास आमची बांधिलकी समजतो . आमचे असे ठाम म्हणणे आहे की वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिन ची संघटन हीच महिला आणि मुलांमधील वेश्याव्यवसाय मध्ये होणारी तस्करी रोखण्यासाठी, ओळख आणि निवारणासाठी समुदायाच्या पातळीवर सर्वात प्रभावी आणि प्रथम प्रतिसादक आहेत . ज्या धोरणास वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिन मानवी तस्करीविरूद्ध लढा देण्याच्या कार्यात भागीदार बनवले गेले आहेत, तेच धोरण कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनापेक्षा अधिक प्रभावी असल्याचे दिसून आले आहे .

पूर्ण दक्षिण आशिया क्षेत्रांमध्ये मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसाय यातील असलेल्या संभ्रमा मुळे आणि कायद्याच्या भाषेमध्ये तसेच सामाजिक हस्तक्षेप कार्यक्रमामध्ये वेश्याव्यवसाय याचा अर्थ फायदा मिळणारे काम अशी व्याख्या झाल्याने या संभ्रमात मध्ये भरच पडलेली आहे. या कारणाने स्थलांतर करणारी स्त्री जर वेश्याव्यवसाय करत असेल तर तिला असंघटित कामगारांसाठी असलेली कुठलीही सामाजिक सुरक्षा योजना मिळू शकत नाही. बऱ्याचदा या व्यक्तींकडे नागरिकत्वाचे कुठलेही पुरावे व कागदपत्रे उपलब्ध नसतात शिवाय त्यांना बऱ्याचदा मानवी तस्करी चे बळी समजले जाते त्याचा परिणाम त्यांचे न्याय मिळवण्याचे हक्कही डावलले जाण्यामध्ये होतो.वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना कामगार न समजता मानवी तस्करीचा बळी समजला गेल्यामुळे त्यांचे कामगार असल्याचे अधिकार कामाची जागा सुरक्षित असणे तसेच हिंसे पासून बचाव या सर्व हक्कांपासून ते वंचित राहतात.

अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा याच्यातील बचाव( सुटका ) छापा टाकणे/धड घालणे आणि पुनर्वसन हे धोरण अयशस्वी होण्याची खूप उदाहरणे आहेत. हा कायदा वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना बाबतीत अतिशय आंधळेपणाने वापरला जातो. भारतातील सर्वोच्च न्यायालयाद्वारे ही याबाबत स्पष्टता दिली असूनही हीच विपरीत परिस्थिती दिसते. सर्वोच्च न्यायालयाने नागरिकांना उपजीविकेचे साधन निवडणे व उपजीविकेच्या साधनांशी संबंधित असण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे. हे स्वातंत्र्य वेश्याव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींसाठी खूप महत्त्वाचे आहे. खरं तर याच व्याख्येनुसार वेश्याव्यवसाय करणाऱ्या व्यक्ती वेश्याव्यवसायात काम करत असतात वेश्याव्यवसाय करत असतात. मानवी तस्करी प्रतिबंधक कायद्या

मधून स्वेच्छेने काम करणाऱ्या प्रौढ व्यक्तींना वगळणे अत्यावश्यक आहे जेणेकरून त्यांना काम करताना सुरक्षा मिळणे शक्य होईल .

मानवी तस्करी किंवा वेठ बिगारी याची तुलना किंवा गल्लत स्वेच्छेने वेश्याव्यवसाय करणाऱ्या प्रौढ व्यक्तींशी करू नये.युनायटेड नेशन च्या विशेष प्रतिनिधी मारिया गार्सिया या मानवी तस्करी बाबत असे म्हणतात की,"शासनाने आणि प्रशासनाने त्यांच्या कायद्यामध्ये अशी तजवीज करू नये की जेणेकरून मानवी तस्करीच्या बळी असलेल्या व्यक्तींना कुठल्याही प्रकारच्या नकारात्मक कारवाईला किंवा कायदेशीर कारवाईला बळी पडावे लागेल याचा अतिशय विपरीत परिणाम पीडित व्यक्ती परिस्थितीवर होतो"त्याच बरोबर सर्व प्रकारच्या लैंगिक सेवांना गुन्हा समजण्यात येऊ नये त्यांना गुन्हेगारीकरणतून मुक्त केले जावे कारण अशा प्रकारच्या वर्तनाला सध्या गुन्हा समजला जात आहे"
पुढील गोष्टीची नोंद घेणेही आवश्यक आहे, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने जो सातवा रिपोर्ट बनवला होता जो वेश्या व्यवसायाशी संबंधित होता, बुद्ध देव करमस्कर विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य फौजदारी अपील क्रमांक 135 2010 सालची केस , ज्यामध्ये वस्ती पातळीवरती पुनर्वसन योजना ची सूचना करण्यात आली होती त्याच बरोबर शासनाच्या सुधारगृहात तथाकथित मानवी तस्करी पीडित महिलांना न ठेवता पर्यायी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात ,जबरदस्तीने वेश्या व्यवसायात आलेल्या स्त्रिया व स्वतःहून वेश्याव्यवसाय करण्यात असलेल्या स्त्रिया यांच्यातील फरक स्पष्ट करावा याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या पण याचा कोणताही समावेश कायद्यात केला गेलेला नाही.

विविध आंतरराष्ट्रीय साधनांद्वारे जागतिक स्तरावर वेश्या व्यवसाय करणाऱ्या व्यक्ति संबंधित धोरणावर परिणाम घडवून आणण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने मोठी भूमिका बजावली आहे , त्यातील सर्वात अलीकडील म्हणजे 2000 साली मानवी तस्करीला प्रतिबंध करणे आणि शिक्षा करणे विशेषतः महिला आणि मुलांबाबत कुठल्याही प्रकारच्या लैंगिक छळवणुकीला निषेध करण्याबरोबरच मानवी तस्करी ची व्याख्या विस्तारित करून त्यामध्ये वेठ बिगारी चाही समावेश करण्यात आला होता.
खरे तर संयुक्त राष्ट्र संघ वेश्याव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या अधिकारासाठी खूप प्रभावीपणे काम करू शकते पण वेश्याव्यवसाय आणि मानवी तस्करी ची सतत गल्लत केली जात असल्यामुळे प्रभावीपणे या मुद्द्यांवर काम होत नाही असे दिसते. त्याचबरोबर वेश्याव्यवसाय हा नैतिकतेच्या आणि तात्विक पायावर बघितले जात असल्यामुळे त्याचे गुन्हेगारीकरण थांबवणे अवघड होऊन बसले आहे. त्याचबरोबर जगभरात नैतिक अनैतिकतेच्या तात्विक चर्चा, गुन्हेगारीकरण नियंत्रण व समूळ बंद करणे या विषयावरती अनेक आंतरराष्ट्रीय संघटना मध्ये वाद चालू आहेत याचा परिणाम प्रत्यक्ष वेश्याव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर सातत्याने होताना दिसतो.

मानवी तस्करी विरोधी कायदे देशातील तील गरीबीची परिस्थिती, समान संधी उपलब्ध असणे तसेच विकासाची जी धोरणे आहेत त्या मोजपट्टी वरच घेऊन बनवले पाहिजे. चांगले राहणीमान मिळवण्यासाठी व्यक्ती बऱ्याचदा स्थलांतर करते आणि असुरक्षित परिस्थितीमध्ये काम करणे त्या व्यक्तीला भाग पडते त्यांची गणना कागदपत्र नसलेल्या कामगारांमध्ये होते आणि पर्यायाने गुन्हेगारीकरण होते.अशा परिस्थिती मध्ये असुरक्षित असलेल्या व्यक्तीला सुरक्षा मिळण्याऐवजी त्यांची तस्करी होण्याची शक्यता वाढीस लागते.
या सर्व मुद्द्यांची व्यवस्थित कारणमीमांसा व विश्लेषण होणे सद्यस्थितीतील covid-19 च्या प्रादुर्भावाचा काळात अत्यंत आवश्यक आहे कारण जगभरात असमानता आणि गरीबी वाढीस लागलेली आहे याचे स्पष्ट पडसाद दक्षिण एशिया क्षेत्रात दिसू लागले आहेत. जागतिक बाजारपेठ ढासळणे, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव अपुरे कायदे आणि सामाजिक सुरक्षिततेचे अपुरे नियोजन यामुळे परिस्थिती अजूनच बिकट होताना दिसत आहे. गरिबी मध्ये वाढ होणे यामुळे वेश्या व्यवसायात येणाऱ्या व्यक्तींचे प्रमाण वाढायची शक्यता आहे पण जगभरात मानवी तस्करी संबंधित कार्य करणाऱ्या सर्वांनी ही वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे गरीबी आणि मानवी तस्करी या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत.
मानवी तस्करी रोखण्याच्या युद्धामध्ये विजय तेव्हाच मिळेल जेव्हा वेश्याव्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना या चळवळीत समाविष्ट केले जाईल.

**#SexWorkersAgainstTraffikers**